आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता
२२ एप्रिल २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपली /सांगलीत काँग्रेसचे विशाल पाटील यांची बंडखोरी कायम

- राज्यात दुसऱ्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी प्रचार शिगेला

- राष्ट्रवादी काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा घोषित /आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण आणि रोजगार या पंचसूत्रीवर काम करणार

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्काराचं वितरण / राम नाईक आणि राजदत्त पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेनसेक्समध्ये ५६० अंकांची वाढ

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातला उमेदवारी मागे घेण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात राज्यात रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या ११ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

**सांगली** मतदारसंघात पाच उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले असून काँग्रेसचे बंडखोर उमेदवार विशाल पाटील यांनी अर्ज मागे घेतला नाही. त्यामुळे आता

महायुती कडून भारतीय जनता पार्टीचे संजय पाटील, महाविकास आघाडी कडून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे चंद्रहार पाटील आणि अपक्ष विशाल पाटील अशी तिरंगी लढत होणार आहे.

**उस्मानाबाद** लोकसभा मतदारसंघात चार उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात ३१ उमेदवार राहिले आहेत.

**सोलापूर** मधे वंचित बहुजन आघाडीचे राहुल गायकवाड, अपक्ष उमेदवार श्रीदेवी फुलारे, राष्ट्रवादीचे प्रमोद गायकवाड यांच्यासह अकरा जणांनी माघार घेतली आहे. आता महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे आणि महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्यासह २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यात नांदेड, हिंगोली, परभणी, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ - वाशिम या आठ मतदार संघात, येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे. या सर्व मतदार संघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे.

**<><><><><>**

अमरावतीमधे आज महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी प्रचारसभा घेतली. केंद्रातलं सध्याचं सरकार शेतकऱ्यांना उपाशी ठेवणारं, महिलांचा अपमान करणारं, युवकांना बेरोजगार

करणारं, आणि दहा वर्षात देश लुटून कंगाल करणारं हुकूमशाही सरकार असल्याची टीका शरद पवार यांनी या सभेत केली. मोदी सरकार नको, तर भारत सरकार हवं आहे, असं ते म्हणाले.

तर, ही निवडणूक शेतकऱ्यांच्या जीवनमरणाची लढाई आहे, असं उद्धव ठाकरे याावेळी म्हणाले. खतांवर १८ टक्के जीएसटी लावणारं मोदी सरकार संविधान बदलण्याचा डाव आखत आहे, त्यांना महाराष्ट्राबद्दल आकस आहे, असा आरोप त्यांनी केला.

काँग्रेसचे महासचिव मुकुल वासनिक, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार यशोमती ठाकूर, इत्यादी नेत्यांची भाषणं या सभेत झाली.

**नांदेड** जिल्ह्यात भोकर इथं महायुतीच्या उमेदवारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची प्रचारसभा होत आहे.

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला सुरुवात झाली आहे. आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या दुपारी राजकीय पक्षाचं प्रसारण संपल्यानंतर प्रसारीत केलं जाईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातले **उमेदवार** अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते यावेळी उपस्थित होते. याच मतदार

संघात महायुतीचे उमेदवार म्हणून शिवसेनेचे सांदिपान भुमरे यांनीही आज नामनिर्देशन पत्र दाखल केलं. बीडमधे राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनावणे यांनी अर्ज दाखल केला.

नंदुरबार लोकसभा मतदारसंघात भाजप उमेदवार डॉ. हिना गावित तसंच काँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी देखील आज उमेदवारी अर्ज भरला. मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांनी देखील अर्ज दाखल केला.

शिर्डी मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार विद्यमान खासदार सदाशिव लोखंडे यांनी अर्ज दाखल केला. त्यानंतर राहता इथं त्यांच्या प्रचारसभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि  महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भाषणं झाली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा पक्षाध्यक्ष उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी आज मुंबईत जाहीर केला. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण आणि रोजगार या ग्रामविकासाच्या पंचसूत्रीवर राष्ट्रवादी काँग्रेस काम करणार आहे, असं ते म्हणाले.

अपारंपरिक वीज निर्मितीला चालना, उद्योगांना प्राधान्य, कृषी पिक विम्याच्या व्याप्तीत वाढ, शेतकरी सन्मान निधीत भरीव वाढ, मुद्रा कर्ज योजनेत

मर्यादित वाढ, जातीनिहाय जनगणना, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना भारतरत्न द्यावा, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा यासाठी पाठपुरावा करणार, ऊर्दू शाळांना सेमी इंग्रजीचा दर्जा, वन क्षेत्रात पाण्याचे साठे निर्माण व्हावेत यासाठी योजना, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व मिळावं यासाठी पाठिंबा, ही या जाहीरनाम्याची ठळक वैशिष्ट्यं असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार मुश्ताक अंतुले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्याबद्दल अजित पवार यांनी त्यांना धन्यवाद दिले.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण बारामती लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनातील दरबार हॉलमध्ये पद्म पुरस्काराचं वितरण झालं. यात तिघाजणांन पद्मविभूषण, सात जणांना पद्मभूषण आणि ५५ जणांना पद्मश्री पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं. या पुरस्कार सोहळ्यात माजी उपराष्ट्रपती एम व्यकंय्या नायडू, आणि भरतनाट्यम नृत्यांगना डॉक्टर पद्मा सुब्रमण्यम यांना पद्मविभूषण पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं. डॉ. बिंदेश्वर पाठक यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार देण्यात आला

उत्तर प्रदेशाचे माजी राज्यपाल राम नाईक आणि ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांना राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

अभिनेता मिथुन चक्रवर्ती आणि गायिका उषा उथ्थप, डॉक्टर सीताराम जिंदाल, हृदयरोग तज्ञ डॉक्टर तेजस पटेल यांनाही पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर इराण-इस्त्रायल युद्धावर तोडगा काढण्यासाठी जागतिक पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्न, जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किंमतीमध्ये झालेली घसरण, यामुळे आशियाई आणि युरोपिय शेअर बाजारात आलेली तेजी, यांचा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारावर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराच्या सेनसेक्समध्ये ५६० अंकांनी वाढ झाली आणि तो ७३ हजार ६४९ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही १८९ अंकांची वाढ झाली आणि तो २२ हजार ३३६ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

गेल्या काही दिवसांपासून सातत्यानं होणारी तापमान वाढ तसंच  उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा अंदाज, या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं आज नवी दिल्लीत बैठक घेतली.

लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यांआधी त्या ठिकाणच्या तापमानावर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगानं पथकाची स्थापना केली आहे. पथकात

निवडणूक आयोग, हवामान विभाग, राष्ट्रीय आपत्ती निवारण आणि आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

उन्हाच्या झळांचा केळी पिकाला मोठा फटका बसत आहे. त्यामुळे प्रामुख्यानं जळगाव आणि सोलापुरात सुमारे १५ हजार हेक्टरवरच्या केळीच्या बागांचं नुकसान झालं असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमान ४० अंशांवर गेलं आहे. तापमान वाढल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात केळीची पानं होरपळत आहेत. पानं आणि खोडांमधून वेगानं बाष्पीभवन होऊन खोड कमकुवत होत आहे.

**<><><><><>**

**भंडारा** जिल्ह्यात आज सकाळी अवकाळी पाऊस पडला. पावसामुळे उन्हापासून नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी उन्हाळी पिकांचं नुकसान होण्याची शक्यता आहे. **धाराशिव** जिल्ह्यातही झालेल्या अवकाळी पावसाचा फटका ३०५ गावांतील २ हजार ८३३ शेतकऱ्यांना बसला आहे. या पावसानं १ हजार ९८१ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभगानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. जयपूरमधल्या सवाई मानसिंग स्डेडिअमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी गारा पडण्याची शक्यता आहे. कोकणात हवामान कोरडे, उष्ण आणि दमट राहील.

राज्यात आज सर्वाधिक तापमान वाशीम आणि वर्धा इथं ४३ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**//<><><><><>//**